Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.S.N.Jadhavar**
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 21 | शोध – शीतला देवीचा प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 85 |
| 22 | धर्माधिष्ठित तत्वज्ञानाचा महिलांवरील अत्याचार : एक चिकित्सा (विशेष संदर्भ मूरळी देवदासी जोगतीण) डॉ. अनिता व्यंकटराव शिंदे | 89 |
| 23 | प्राचीन भारतातील कर्तबगार स्त्रिया आणि स्त्रियांचा दर्जा- एक दृष्टिक्षेप प्रा.डॉ.संतोष रोहिदास पहारे | 92 |
| 24 | 'हैदराबाद मुक्ती संग्रामात स्त्रियांचे योगदान डॉ.राजाराम रा पिपळपल्ले | 95 |
| 25 | भारताच्या अज्ञात इतिहासातील कर्तबगार राणी दुर्गावतीचा इतिहास प्रा.डॉ राजविरेंद्रसिंग रुवजी गावित | 100 |
| 26 | महिला सक्षमीकरणाची संकल्पना आणि सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक आशय प्रा. शरद बाबुराव सोनवणे | 105 |
| 27 | भारतवर्ष की ऐतिहासिक महिलाओं का देश के प्रति योगदान : स्त्री विमर्श डॉ. रज़िया शहेनाज़ शेख अब्दुल्ला | 108 |
| 28 | पंचायती—राज में महिला नेतृत्त्व और अशिक्षा सद्दाम हुसैन | 111 |
| 29 | औरंगाबाद शहरातील एच.आय.व्हि सह जीवन जगणाऱ्या रूग्णांना सेवा पुरविणाऱ्या व्यावसायिकांचे एच.आय.व्हि चे प्रमाण व परिणामाबाबत मत. सुषमा शंकर तिनगोटे | 115 |
| 30 | पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या महिलांचा राजकीय सहभाग विशेष संदर्भ कळंब तालुका डॉ. नामानंद गौतम साठे | 120 |
| 31 | प्रमुख १४ बँकांचे राष्ट्रीयकरण: श्रीमती इंदीरा गांधी यांची भुमिका एक चिकित्सक अभ्यास. प्रा. डॉ. एस एल मेढे | 122 |
| 32 | मराठवाड्यातील स्त्री चळवळीचा चिकित्सक अभ्यास डॉ. मुळे पी.एम. | 126 |
| 33 | कौटुंबिक हिंसाचार : भारतीय महिला प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 129 |
| 34 | बौध्द धर्मातील स्त्रीयांचे स्थान व भूमिका प्रा.डॉ.सुवर्णा उमाकांत टेंकाळे (वाले) | 131 |
| 35 | सावित्रीबाई फुलेंची कामगिरी प्रा.कांबळे शिवाजी ईरबा | 135 |
| 36 | भारतीय शेती व शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला डॉ.एम.डी.कच्छवे. | |
| 37 | मराठी साहित्यातील स्त्रीचित्रण - एक अभ्यास प्रा. डॉ. रामहारी मायकर | 143 |
| 38 | स्त्रीवादी साहित्य मुळाटे श्रीधर सुधाकर | 147 |
| 39 | मराठी स्त्रीवादी साहित्य प्रा.डॉ. हरिचंद नांगसू नरेटी | 150 |
| 40 | भारतीय स्त्री आणि मानवअधिकार Pathan Asad Ahemad | 153 |




Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

# पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या महिलांचा राजकीय सहभाग विशेष संदर्भ कळंब तालुका

डॉ. नामानंद गौतम साठे
राज्यशास्त्र विभागप्रमुख, शि.म.ज्ञानदेव मोहेकर माहाविद्यालय कळंब
मो.नं. ९७६५२५६८१२

**प्रस्तावना :**

भारतीय ग्रामीण सामजातील विशेषत : बहूजन समाजातील स्त्रियांना वर्षानुवर्षे घराच्या चार भिंतीच्या आतच अडकून ठेवण्यात आले होते. चूल आणि मूल या पलीकडे महिलांचे कार्यक्षेत्र नव्हते भारतीय राज्यघटनेने जरी सर्वांना समान अधिकार दिले असले तरी सामाजातील विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या लोकांना त्यांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याचा लाभ घेता येणार नाही, हे ओळखून त्यांच्यासाठी काही संरक्षक तरतूदी केल्या आहेत आणि त्यामूळेच महिलांना संधीवंचित, हक्क वंचति आणि सत्ता वंचित न ठेवता त्यांचे सबलीकरण करण्याचे मानस, राजकीय इच्छाशक्ती व त्याला प्रत्यक्ष स्वरुप देण्यासाठी करावयाच्या कायदेशीर तरतूदींना फार महत्व दिले जाते.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१) कळंब तालुक्यातील विमुक्त जाती आणि भटक्या जमातीची पार्श्वभूमी जाणून घेणे.
२) पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या महिलांचा राजकीय सहभाग जाणून घेणे.
३) समग्र पंचायतराज व्यवस्थेचे अभ्यासपुर्ण अध्ययन करुन महिलांच्या राजकीय सहभागाबाबत समस्या जाणून घेणे.
४) विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या सामाजिक व राजकीय स्थितीचा आढावा घेणे.
५) विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या महिलांचा राजकारणाबाबतचा दृष्टीकोण तपासणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधनात तथ्य संकलन हा महत्वाचा घटक असून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधनासाठी ग्रंथालयीन साहित्य व प्राथमिक स्त्रोतात प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखत, अनुसूची आणि प्रश्नावली तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तूत संशोधन विषयाचे क्षेत्र म्हणून कळंब तालूका निवडला आहे. या तालुक्यात ९४ गावे आहेत. त्यापैकी काही गावांची निवड सहेतूक नमूना निवड पध्दत म्हणन करण्यात आली आहे. त्या आधारे पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमतीच्या महिलाचा राजकीय सहभाग विशेष संदर्भ कळंब तालूका या विषयवार वस्तूनिष्ठ निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**विमुक्त जाती आणि भटक्या जमाती :**

सध्या भारतात एक हजार भटक्या विमुक्तांची पंधरा कोटीच्या असपास लोकसंख्या आहे आणि महाराष्ट्रात एक कोटीच्या आसपास असावी असे २००८ चा रेणके आयोग सांगतो. महाराष्ट्रात एकूण ३५ भटक्या जमाती आणि १४ विमुक्त जाती व २०० च्यावर पोटजातीची संख्या आहे. इ.स. १८७१ ला ब्रिटीशांनी गुन्हेगार जमाती कायद्याने भारतातील १९८ जातीना गुन्हेगार जाती म्हणून जाहीर केले होते. त्यापैकी १४ जाती महाराष्ट्रातील आहेत.वरील जातीतील लोकवस्तीना तारेचे कुंपन करुन बंदीस्त करण्यात आले होते.२३ ऑगस्ट १९६० रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवहारलाल नेहरु यांनी सोलापूर येथील प्रतिकात्मक तारेचे कुंपन तोडून या जातीना मुक्त केले तेंव्हापासून या जाती विमुक्त या नावाने ओळखल्या जातात. तसेच ज्या जमाती उदरनिर्वाहासाठी भटकंती करतात अशा जातीना मिळून भटक्या - विमुक्त जाती जमाती हा शब्द प्रयोग केला जातो.

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती जमातीत अनेक पोटजाती आहेत यांच्यात रोटी व्यवहार होतात, पण बेटी व्यवहार होत नाहीत. प्रत्येक जात पोटजात इतर जाती पोटजातीपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजते. त्यांचे संस्कार, विधी वेशभूषा, बोलीभाषा, राहणीमान स्वतंत्र आणि इतरांपेक्षा भिन्न आहे. त्यांना जाती परंपरा आणि जाती इतिहासाचा पराकोटीचा अभिमान आहे.स्वत: आठरा विश्व दारिद्यात हा समाज असला तरी यांच्यात अस्पृश्यता कायम आहे. परंपरेने दलित असलेल्या वस्तीत हा समाज भिक मागत नाही अथवा त्यांनी दिलेली वस्तू घेत नाहीत स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही सबलीकरणत न्यायमंडळ यशस्वी भूमिका बजावत असले, तरी हा समाज जात पंचायतीवर आणि त्यांच्या न्यायदान व्यवस्थेवर विश्वास ठेवून आहे. पारंपारिक रुंढी, प्रथा, परंपरेतून समाज अद्याप बाहेर आला नाही.



Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

भारतातील प्राचीन सामाजिक व्यवस्थेने ब्राम्हण, क्षेत्रीय,वैश्य आणि शुद्र या वर्णाचे कार्य निश्चित केले. भटका विमुक्त समाज हा प्राचीन भारतीय परंपरेत अस्तित्वात नव्हता तो क्षेत्रीय, वैश्य आणि शुद्र या तीन वर्गात सामावलेला असावा असे त्याच्या कार्यावरुन अंदाज बांधता येतो. उत्तर वैदिक कालखंडत कर्मावर आधारित बंदीस्त जातीव्यवस्था स्थिर झाली या काळात प्रामुख्याने लोक दोन प्रकारची कार्य करत एक शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने शेती संबधीत कार्य उदा. आलुतेदार व बलुतेदाराचे कार्य व दुसरे कार्य म्हणजे राजा व राजदरबारी उपयोगी कार्य उदा. शस्त्र निर्मिती, सैन्य, मनोरंजन आणि गुप्तहेर इ.. मोगल आणि ब्रिटिशांच्या आगमनाने पारंपारिक राजकीय व्यवस्था नष्ट झाली व राजदरबारी कार्य करणारा वर्ग बेकार झाला हा वर्ग शेती सहायक बलुतेदार व आलुतेदार व्यवस्थेचा भाग बनू शकला नाही. किंबहुना गावगाडयाने त्यांना सामावून घेतले नाही त्यामुळे ते भटकत राहीले.

गावगाडयाबाहेर च्या भटक्या जाती जमातीना स्थलांतरित ठेवल्यामुळे भटक्यांच्या श्रमशक्तीचे रुपांतर गावगाडयाच्या श्रमकार्यात होण्याची प्रक्रीया थांबली. गावागाडयातील श्रमिक जातीचा श्रमशक्ती पुरवठयात अतिरिक्त भर पडणे आणि त्यातून उपभोगाच्या वाटयातील कपात होणे या संकटापासून शुद्राच्या हितसंबंधाचे रक्षण केले गेले. भटक्यांना गावगाडयाबाहेर ठेवण्यास जशी शुद्राने भूमिका बजावली, तशी सवर्ण जातीनेही आपले योगदान दिले. भटक्या जमातीची संस्कृती ही अवैदिक असल्यामुळे वैदिक संस्कृतीप्रेमी लोंकानी संस्कृती भ्रष्ट होऊ नये. म्हणून भटक्या विमुक्तांना गावगाडयात सहभागी करुन घेतले नाही. तेव्हा उपजीविकेसाठी भटक्या विमुक्त जातीने देवाच्या नावावर भिक मागणे, लोकांचे मनोरंजन करणे, शिकार करणे गावगाडयाचे निमित्तीक कामे. यासारखे कामे करुन हा समाज स्थलांतरातून दयनीय अवस्थेत आपली उपजीवीका भागवत होता.

स्वातंत्र्योत्तर भारताने लोकशाहीचा स्वीकार केला आणि देशातील सामान्य लोकांना व दीन दलितांना सत्तेत वाटा प्राप्त झाला, परंतु भटक्या - विमुक्त जाती जमाती या राजकीयदृष्टया उपेक्षितच आहेत. सततचे स्थलांतर, राजकीय जागृतीचा अभाव, प्रभावी राजकीय संघटनेची कमतरता यामुळे हा समाज लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेचा भागीदार बनला नाही. परंतु १९९३ च्या ७३ घटनादुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेत आरक्षणाची तरतुद केल्यामुळे कांही अंशी यांचा सत्तेतील सहभाग वाढला आहे विशेषता कळंब तालुक्यातील देवधानोरा, बोर्डा, बोरंगाव (ध), गोविंदपुर, उपळाई, इत्यादी गांवाध्ये ग्रामपंचायतीमधील भटक्या विमुक्त जाती व जमातीच्यां महिलांचा सहभाग आपणास दिसून येतो.

**सारांश :**

१९९३ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले व त्यानंतर महाराष्ट्रामध्ये ५० टक्के आरक्षण महिलांना देण्यात आले आणि त्यामूळे कळंब तालूक्यात विमूक्त जाती आणि भटक्या जमातीच्यां महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. तसेच यामूळे महिला नेतृत्वाचा उदय होत आहे. त्याचबरोबरच या आरक्षणामूळे विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या महिलामध्ये राजकीय जागृती निर्माण झाली आहे आणि त्यांना त्यांच्या समस्यांची जाणीव झाली आहे आणि यामूळे ग्रामीण भागातील शोषित पिडीत, वंचित वर्गातील महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) बडे जी.एस. : भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, उगम आणि विकास, हिमालय पब्लिकेशन्स हाऊस, मंबई, १९७८.
२) भांडारकर पु.ल. : सामाजिक संशोधन पध्दती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९७८.
३) बोधनकर सुधीर व विवेक अलोनी : सामाजिक संशोधन पध्दती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९९.
४) पोले कांतराव प्रल्हादराव : महाराष्ट्रातील पंचायतराज आणि महिला आरक्षण, अरुणा प्रकाशन, लातूर, २००९.
५) पटाण जी.के. व मंग्नोळे व्ही.एस. : महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन, इंटेलेक्च्युअल बुक ब्यूरो भोपाळ, २००५.



Scanned by CamScanner